तरुण भारत  शुक्रवार, २५ डिसेंबर २०१५

# दुर्बल घटकांसाठी कामाचा आनंद अवर्णनीय

**नसीमा हुरजूक यांचे प्रतिपादन** दोडामार्गात 'मायलेकी' मेळावा : हेल्पर्स ऑफ दी हँडीकॅप्ड संस्थेला भाऊबीज निधी केला प्रदान

· प्रतिनिधी
दोडामार्ग

समाजात अपंगांबरोबरच अनेक दुर्बल घटक अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. या घटकांसाठी सर्वांनी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. आपल्याबरोबरच्या दुर्बल घटकांना पुढे नेले तरच आपला उत्कर्ष होईल. दुर्बलांसाठी काम करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्थांना मदत देण्याचा आनंद अवर्णनीय आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजसेविका आणि हेल्पर्स ऑफ दि हँडीकॅप्ड संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती नसिमा हुरजूक यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्यावतीने 'लेक लाडकी' अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि त्यांच्या माता यांचा 'मायलेकी' मेळावा आयोजित केला होता. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने तसेच सावित्रीबाई फुले व लक्ष्मीबाई हळबे यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी एकाच कन्याप्राप्तीनंतर कुटुंबनियोजन करणाऱ्या तालुक्यातील माधुरी सावंत, वसुंधरा गवस, वैशाली गवस तसेच स्वावलंबी अपंग कु. संगीता राऊळ, कर्तबगार स्त्री माधवी मणेरकर, सुजल सूर्यकांत गवस तसेच युवती स्वयंनिर्भर निधी अर्थात भाऊबीज निधी जास्त संकलन करणाऱ्या विद्यार्थिनी प्रज्ञा शिरोडकर, ज्योती जाधव, महाविद्यालयाच्या वरिष्ठ लिपीक किरण नाईक यांचा श्रीमती हुरजूक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**जादा निधी संकलन करणाऱ्या विद्यार्थिनींचा सत्कार**

### गरज नसते तेव्हा हजारो हात पुढे...

अपंगांच्या डोळ्यातला अपंगत्वाचा ठसा मिटविण्यासाठी त्यांना स्वावलंबी बनविले पाहिजे. त्यासाठी त्यांच्या स्वतंत्र शाळा हव्यात. कारण सर्वसाधारण मुलांच्या शाळेत अपंगांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मी स्वतः ते अनुभवले आहे. कधी-कधी जेव्हा माणसाला खरी गरज असते तेव्हा कोणीही मदत करत नाही. पण जेव्हा गरज नसते तेव्हा हजारो हात पुढे येतात. तेव्हा योग्यवेळी त्यांना मदत केली पाहिजे.



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात नसीमा हुरजूक यांचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील व अन्य.

### हुरजूक यांना मदत

यावेळी हुरजूक यांचा जीवनप्रवास आणि कार्यावर आधारित लघुपट दाखविण्यात आला. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. पाटील यांनी महाविद्यालयाने राबविलेल्या नवनवीन उपक्रमांची माहिती देऊन महिला विकास कक्षाच्या स्थापनेमागील उद्दिष्ट कथन केली. हुरजूक यांच्या हेल्पर्स ऑफ दि हँडीकॅप्ड संस्थेला विद्यार्थिनींनी जमा केलेल्या भाऊबीज निधीतून पाच हजाराचा धनादेश हुरजूक यांना देण्यात आला. सुजल सूर्यकांत गवस यांनी दोन हजाराची आर्थिक मदत दिली.

प्राचार्यांच्या हस्ते श्रीमती हुरजूक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यापीठावर संस्थेचे स्थानिक सदस्य विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागप्रमुख आर. एस. इंगळे, किरण नाईक तसेच प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन किरण नाईक यांनी केले. तर आभार पौर्णिमा वराडकर हिने मानले.